जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# प्रेसनोट क्रमांक - ४५२ दिनांक -२५/१०/२०२४

समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर

## चोरटयांकडुन ०४ दुचाकी वाहने व ०६ मोबाईल जप्त

समर्थ पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गुन्हा रजि नंबर २२८/२०२४ भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम ३०३(२), ३(५) अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी यांची राहते घरासमोर पार्क केलेली मोटर सायकल अज्ञात इसमाने चोरी केली म्हणुन दिनांक-२२/१०/२०२४ रोजी वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या आदेशान्वये दाखल गुन्हयाचे तपास अनुषंगाने समर्थ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी व अमंलदार दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले वाहन तसेच चोरटया इसमाचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार शेख, गावडे, घोरपडे यांनी घटनास्थळ व आजुबाजुचे परीसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज तपासुन तांत्रीक विश्लेषना आधारे तसेच गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासपथकातील पोलीस अंमलदार चोरीस गेलेले वाहनाचा शोध घेत सारस्वत कॉलनी परीसरात आले असता तेथे दोन इसम त्यांच्याकडे पाहुन संशयीतरीत्या त्यांच्या ताब्यातील दोन दुचाकीवरून तेथुन पळुन जावु लागल्याने सदर इसमांचा पाठलाग करून त्यांना थांबवुन त्यांचे नाव,पत्ता विचारून त्यांच्या ताब्यात असलेल्या दुचाकी वाहनाबाबत विचारपुस केली असता सदर दोन्ही इसम उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने त्यांना त्यांचेकडील दुचाकीसह ताब्यात घेऊन समर्थ पोलीस स्टेशन येथे आणुन सदर इसमाकडे अधिक चौकशी केली असता त्यांची नावे-**१) अविनाश पप्पु अडसुळे वय-१८ वर्षे ०८ महिने धंदा-केटरर्स राहणार-कोल्हापुरकर यांच्या खोली मध्ये यशोदीप चौक जवळ वारजे माळवाडी पुणे. व दुसरा विधीसंघर्षीत बालक असल्याचे तसेच सदर इसमांनी त्यांचे इतर साथीदार नामे सुशांत ऊर्फ (बंटी) बाबुराव शिंदे व आणखी एक विधीसंघर्षीत बालक** यांच्या मदतीने सदरील दुचाकी वाहनांची चोरी केली असल्याचे समजले.

तदनंतर आरोपी नामे-१) अविनाश पप्पु अडसुळे वय-१८ वर्षे ०८ महिने राहणार- कोल्हापुरकर यांच्या खोली मध्ये यशोदीप चौकाजवळ, वारजे माळवाडी पुणे. व ०२) सुशांत ऊर्फ (बंटी) बाबुराव शिंदे वय-१८ वर्षे ०४ महिने राहणार-कोल्हापुरकर यांच्या खोलीमध्ये, यशोदीप चौकाजवळ, वारजे माळवाडी पुणे. यांना दाखल गुन्हयात अटक करून त्याचेकडे केले तपासामध्ये आरोपीतानी दोन विधीसंघर्षीत बालकांसह वारजे माळवाडी परीसरातुन व समर्थ पोलीस स्टेशन परीसरातुन आणखी काही दुचाकी वाहने तसेच मोबाईल फोन चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झालेने वरील नमुद आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांच्या कडुन तब्बल ०४ दुचाकी वाहने तसेच ०६ मोबाईल फोन, ०१ कॉलेज बॅग त्यामध्ये ०१ पाकीट व महत्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली असुन यामध्ये वारजे माळवाडी पोलीस स्टेशन कडील ०१ वाहन चोरीचा गुन्हा तसेच समर्थ पोलीस स्टेशन कडील ०३ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर,श्री.प्रविण पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०१,पुणे श्री.संदीपसिंह गिल, मा.सहा.पोलीस आयुक्त फरासखाना

विभाग,पुणे श्रीमती. नुतन पवार, समर्थ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उमेश गित्ते यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक जालिंदर फडतरे, सहा.पोलीस फौजदार पागार, पोलीस अंमलदार इम्रान शेख, रोहीदास वाघेरे, रविंद्र औचरे,शिवा कांबळे, अमोल गावडे, रहीम शेख, शरद घोरपडे, अर्जुन कुडाळकर यांनी केली आहे.